महासागर अमरावती

सोमवार, दि. 4 नोव्हेंबर 2024





# बापाच्या डोळ्यादेखत वाघाने मुलाला केले ठार

## चिखलदरा तालुक्यातील किशोरपूर येथील घटना

### परिसरात दहशत



महासागर प्रतिनिधी

चुरणी (दि.3) - चिखलदरा तालुक्यातील केशरपूर येथील लाकडं आणण्यासाठी जंगलात गेलेल्या आदिवासी युवकावर वाघाने हल्ला करत, त्याला ठार केले. यावेळी या युवकाचे वडील व इतर सहकारी उपस्थित होते. वाघाच्या हल्ल्यानंतर हे आपला जीव वाचवित सुरक्षित स्थळी पोहोचले. ही रविवार सकाळी 8 वाजता घडली.

हरिराम गंगाराम धिकार (वय 35 रा. केशरपूर) असे मृतक युवकाचे नाव आहे. हरिराम हा सकाळी आठ ते नऊ वाजताच्या दरम्यान जंगलामध्ये गेला होता. लाकडं आणण्यासाठी गोळा करताना त्यांच्यावर वाघाने अचानक हल्ला केला. यावेळी त्यांच्या सोबत त्याच्या वडीलांसह तीन इतर नातेवाईक होते, ते आरडाओरडा करत पळाले. परंतु हरिराम हा जागीच ठार झाला. ही घटना हरीसाल वनपरिक्षेत्र अंतर्गत घडली असून अकोट फाट्या पासून मुख्य रस्त्यापासून तीन किलोमीटर अंतरावर नावबोरे नाला येथे ही घटना घडली आहे. या घटनेची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांना मिळताच वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश जतकर, धारणीचे ठाणेदार अशोक जाधव, पीएसआय सतीश झाल्टे, तारूबांधाचे वनपरिक्षेत्र अधिकारी राजेश महल्ले इत्यादी उपस्थित होते. या घटनेमूळे परिसरातील नागरिक दहशतीखाली आले आहे.

### मृतकाच्या कुटूंबियांना पाच लाखांची मदत

घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. यावेळी पोलीस प्रशासनाचे अधिकारी तसेच आमच्या वनविभागाचे अधिकारी उपस्थित होते. मी स्वत:ही उपस्थित होतो. घटनास्थळी दोन पंचनामे केला आहे. घटना सकाळी नऊच्या दरम्यानची असावी प्रतिबंधित क्षेत्रामध्ये ही घटना घडली आहे. हरीसाल वनपरिक्षेत्र मध्ये ही घटना घडली आहे. प्रत्येकाच्या नातेवाईकांना उद्या सकाळी पाच लाख रुपये मदत देण्यात येणार आहे. उर्वरित रक्कम कागदपत्र पूर्ण झाल्या नंतर देण्यात येणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश जतकर यांनी बोलतांना सांगितले.

# ...तर महायुती रवी राणांचा पाठींबा काढून घेणार?

- रमेश बुंदिले यांचे नामांकन परत घेण्याकरिता थेट इशारा
- जिल्ह्यातील शिंदे सेना प्रिती बंड यांना समर्थन देण्याचा मानसिकतेत

रोहित गासे

अमरावती,(दि.3) - दर्यापूर विधानसभा मतदारसंघात रवी राणा यांनी आपल्या युवा स्वाभिमान पक्षाकडून उभे केलेले रमेश बुंदिले यांनी तातडीने उमेदवारी परत घ्यावी, अन्यथा बडनेरा मतदारसंघातून रवी राणा यांचा महायुतीकडून पाठींबा काढून घेतला जाईल, असा थेट इशारा वरिष्ठ स्तरावरुन राणा यांना देण्यात आला असल्याची विश्वनिय माहिती आहे. इतकेच नव्हे, जर बुंदिलेंची उमेदवारी कायम राहीली, तर शिंदे गटाची शिवसेना थेट बडनेरा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार प्रिती बंड यांना समर्थन देत राणा विरुध्द रणशिंग फुंकण्याच्या मानसिकतेत असल्याचे चित्र आहे, असे झाल्यास रवि राणा यांचा 'पाना' विजयाच्या नटाला लागण्याअगोदर तुटून खाली पडेल, यात दुमत नाही.



दर्यापूर विधासभेमध्ये पराभूत होवून एक दशक पुर्ती झाल्यानंतर माजी आमदार कॅ.अभिजीत अडसुळ पुन्हा एकदा नव्या जोमाने नविन नेतृत्वाच्या शिवसेनेसोबत निवडणूकीच्या मैदानात उतरले आहे. लढतीला तोडीस तोड उमेदवार नसल्यामूळे विजयाचे चित्र स्पष्ट दिसत असताना रवी राणा यांनी खेळी केली, आणि युवा स्वाभिमानच्या तिकीटावर भाजपचे माजी आमदार रमेश बुंदिले यांना उभे करुन कॅ.अभिजीत अडसुळ यांना कोंडीत पकडले. लोकसभेत युतीधर्माचा जप करत वरिष्ठांना वारंवार तक्रारी करणारे रवी राणा येथे मात्र स्वत- युतीधर्म विसरले असल्याचा आरोप होत आहे, आता ही बाब थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जिव्हारी लागली आहे. कारण अमरावती जिल्ह्यामध्ये अभिजीत अडसुळ यांच्या रुपाने शिवसेनेला (शिंदे गट) एकमात्र जागा मिळाली आहे. मेळघाट मतदारसंघात शिवसेनेसाठी सुटणारी जागा रवी राणा यांनी भाजपकरिता हिसकावून आणली, असे असताना आपले एक-एक उमेदवार निवडून आणण्यासाठी जिवाचे रान करित असलेले एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नावर रवी राणा पाणी फेरण्याचे काम करित आहेत. त्यामूळे शिवसेनेने आरपार ची लढाई छेडण्याचा चंग बांधला आहे. आता बुंदिले यांची उमेदवारी राणांकरिता पायावर दगड मारुन घेण्यासारखी ठरताना दिसत आहे.

### शहांच्या शिष्टाईनंतर थांबले अडसुळ

गेल्या लोकसभेमध्ये महायुतीचा उमेदवार म्हणून खा.आनंदराव अडसुळ यांनी उमेदवारी मागितली होती. परंतू केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी शिष्टाई करित अडसुळांना थांबण्याची विनंती केली. या बदल्यात अडसुळांना राज्यपाल पदी आरुढ करण्याचे आश्वासन देण्यात आले होते, त्यामूळे आनंदराव अडसुळ थांबले, आणि कोकणमध्ये महायुतीचे उमेदवार नारायण राणे यांच्या प्रचाराला लागले. दुसरीकडे अभिजीत अडसुळ यांनीही आपल्या घरी आलेल्या राणा दाम्पत्याचे औक्षवण करुन स्वागत केले. सर्व सामान्य होत असताना अचानक लोकसभेतील पराभवाचा सुड उगविण्याकरिता राणांनी आखणी केली, अभिजीत अडसुळविरुध्द रमेश बुंदिले यांना उभे करत अडसुळांना अडचणीत आणले.

### मागे हटणार नाही-भारतीय

दुसरीकडे भाजप नेते तुषार भारतीय यांनी काही झाले तरी आपण मागे हटणार नसल्याचे दै.महासागर ला सांगितले आहे. त्यामूळे प्रस्थापित रवी राणांना आपली वोट बँक वाचविताना नाकी नऊ येणार आहे.

### मविआने लावली पुर्ण ताकद

महाविकास आघाडी समर्थित व उबाठा शिवसेनेच्या उमेदवारीवर उभे असलेले सुनिल खराटे यांना विजयी करण्याकरिता महाविकास आघाडीनेही आपली पुर्ण ताकद पणाला लावली आहे. काहीही झाले तरी यंदा गड जिंकायचाच असा चंग मविआच्या शिलेदारांनी बांधला आहे.

# दोघांजवळील दोन देशी कट्टे जप्त


### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

महासागर प्रतिनिधी

अमरावती (दि.3)- आगामी काळात जिल्ह्यात पार पडणार्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये तसेच निवडणुक ही निष्पक्ष व भयमुक्त वातावणात पार पडावी, करिता अमरावती ग्रामिण घटकाचे कायक्षेत्रात विशेष अभियान राबवून अवैध शस्त्र विक्री/बाळगणे, अवैध दारू विक्री, वाहतुक ईत्यादी प्रकारावर पुर्णत: आळा घालण्याबाबत पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी आदेशित केले आहे.



2 नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मोर्शी हद्दीत गस्तीवर असतांना गुप्त माहीती मिळाली की, राजेश पंजाबसिंग भादा (34, रा. रोहना, जि. बैतुल, मध्यप्रदेश, ह. मु.हीवरखेड, ता. मोर्शी) हा होवरखेड येथील त्यांचे राहत्या घरी अवैधरित्या विनापरवाना देशी बनावटी पिस्तुल सदृश्य लोखंडी देशी कट्टा बाळगुन आहे. सदरची माहीतीवरून पोलिस पथकाने त्वरीत हीवरखेड गाठुन आरोपीच्या घराची झडती घेतली असता त्याच्याजवळ 1 देशी कट्टा (25 हजार किमंत) मिळुन आला. त्यामुळे पोलिसांनी आरोपीविरूध्द मोर्शी येथे गुन्हा नोंद केला असुन पुढील तपास मोर्शी पोलीस करित आहेत. त्याचप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पथ्रोट हद्दीत सादीक खान साबीर खान (29, रा. अजीजपुरा, अजंनगांव) याच्याजवळून विनापरवाना लोखंडी देशी कट्टा जप्त केला



आहे. तसेच त्याच्या ताब्यातून दोन जिवंत काडतुस जप्त करण्यात आले आहे. आरोपीविरूध्द पथ्रोट येथे गुन्हा नोंद करण्यात आला. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांच्या मागदर्शनात पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वातील पीएसआय सागर हटवार, नितीन इंगोले, अमंलदार गजेन्द्र ठाकरे, रविन्द्र बावणे, पंकज फाटे, त्र्यंबक मनोहर, सुनिल महात्मे, सै. अजमत, निलेश डांगोरे यांचे पथकाने केली आहे.

# दोन ट्रॅव्हल्सची समोरासमोर धडक, एकाचा मृत्यू

## दोघांची प्रकृती गंभीर, 15 जण किरकोळ जखमी | मुर्तीजापूर हद्दीत धनज येथील घटना

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.3)- उभ्या ट्रॅव्हल्सवर भरधाव दुसरी ट्रॅव्हल्स धडकल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर आणि 15 जण किरकोळ जखमी झाले. ही घटना मूर्तिजापूर पोलीस स्टेशन हद्दीत धनज गावाजवळ शनिवारी मध्यरात्री घडली.

रॉयल ट्रॅव्हल्सची बस अमरावतीवरून पुणे शहराकडे निघाली होती. दरम्यान धनज गावाजवळ ट्रॅव्हल्सचा टायर पंचर झाला. त्यामुळे वाहक हा ट्रॅव्हल्सचा टायर बदलवित होता. अशातच नांदेडकडून नागपूरकडे भरधाव जाणारी खुराणा नामक ट्रॅव्हल्स अचानक उभ्या असलेल्या रॉयल ट्रॅव्हल्सवर धडकली. अपघात इतका भीषण होता की उभ्या असलेल्या रॉयल ट्रॅव्हल्सचा चालक जागीच ठार झाला. श्रीधर पुंडलिकराव तायवाडे (रा.हनुमान नगर, अमरावती) असे मृताचे नाव आहे.



### भाऊबिजमुळे ट्रॅव्हल्समध्ये प्रवाशांची गर्दी

भाऊबीज सणानिमीत्त दोन्ही खाजगी ट्रॅव्हल्समध्ये प्रवाशांची संख्या अधिक होती. सर्व प्रवासी गाढ झोपेत असताना हा अपघात झाला. या भीषण अपघातानंतर काही काळासाठी मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच मूर्तिजापूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बचाव कार्य करत जखमींना ट्रॅव्हल्सच्या बाहेर काढले. तसेच जखमी प्रवाशांना अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले तर काहींना अकोला, मुर्तीजापुर येथेही पाठविण्यात आले.

### विना कागदपत्राची धावत होती ट्रॅव्हल्स

अपघातानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून जेव्हा खुराणा ट्रॅव्हल्स बसचे कागदपत्र तपासण्यात आले, तेव्हा अनेक कागदपत्राची पुर्तता या ट्रॅव्हल्स मालकाकडून करण्यात न आल्याचे समोर आले, पैशांकरिता हे ट्रॅव्हल्स मालक अनेक प्रवाशांच्या जीवाशी खेळत असल्याचे यावेळी पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

# गाई गोंधनच्या दिवसाचा म्हसोबा झाला दुर्मीळ

### लोकसंस्कृतीचा ऐतिहासिक ठेवा

महासागर प्रतिनिधी

पथ्रोट, (दि.3) - दिवाळीमध्ये अंगणात शेणापासून केल्या जाणाऱ्या नरकासुर, महिषासुर, म्हसोबा तयार करण्याची प्रथा इतर अनेक प्रथांप्रमाणे हळूहळू लोप पावतेय. महाराष्ट्राच्या ग्रामजीवनाचं आणि गतकालीन ग्रामीण स्त्रियांचं भावविश्व उलगडणाऱ्या या गवळणी आता इतिहासजमा झाल्या आहेत. आता तर दारात गायीगुरंच नसल्याने शेणही मिळत नाही आणि नव्या पिढीची मंडळी शेणात हात घालायला तयार होत नाही. यामुळे लोकसंस्कृतीचा हा ऐतिहासिक ठेवा नष्ट होतोय, अर्थात काळाच्या प्रभावानुसार अशा गोष्टी घडत असतातच हेही मान्य केले पाहिजे.

दिवाळी हा कृषी जीवनावर आधारीत सण. गावांत शहरांत प्रत्येकजण आपापल्या ऐपतीप्रमाणे दिवाळी मोठ्या उत्साहाने साजरा करतो. दिवाळीच्या पाच दिवसांमध्ये कृषी संस्कृतीवर आधारीत विविध प्रथा आणि परंपरा साजऱ्या होतात. समृध्द लोकजीवनाचे दर्शन त्यातून घडतं. वेगवेगळ्या प्रांतात दिवाळी विविध पध्दतीने साजरी होते. त्यातून लोकजीवनाचं दर्शन प्रकर्षाने होते. महाराष्ट्रात दिवाळीच्या आगळ्या प्रथा-परंपरा आहेत. त्यापैकीच एक म्हणजे दिवाळीच्या पाच दिवसांमध्ये अंगणामध्ये शेणापासून तयार केल्या जाणाऱ्या कोथई (एक स्त्री प्रतिमा). पूर्वी गावांमध्ये भरपूर गायीगुरं असल्याने शेण मिळायचे. या शेणापासून धनत्रयोदशीच्या दिवशी पहिली गवळण, कोथई तयार केली



जायची. घरातील स्त्रिया या गवळणी बनवत. बाळगोपाळांचा उत्साह त्यावेळी ओसंडून वाही. प्रत्येक घरातील स्त्रिया मोठ्या कल्पकतेने या गवळणी बनवत. छोटे शेण गोळे बनवून आधी त्यांना बाहुल्यांचा आकार दिला जाई. सजावटीसाठी पाना-फुलांचा वापर करण्यात येई. कल्पनेतलं एक आटपाट नगरच या गवळणींच्या माध्यमातून उभे केलं जाई. पाच दिवस लोकजीवनातील वेगवगेळ ?ा घडामोडी या गवळणींच्या माध्यमातून दाखविण्यात येत असत. याकरिता अंगणाचा कोपरा राखून ठेवला जायचा. त्याला शेणाने सारवण्यात येई. त्याच्या मध्यभागी झोपलेला म्हसोबा बनविला जायचा. म्हसोबाला सजविण्यासाठी पाना-फुलांचा वापर केला जाई. कापुस व कापसाच्या फुलांच्या, पानांच्या माळा गळ्यात घालत.

पाच दिवस रोज वेगवेगळ्या प्रकारे प्रतिमा तयार करण्यात येत. प्रत्येकजण आपापल्या कलाकौशल्याचं दर्शन शेणाच्या या म्हसोबा करताना घडवत असे. लोकसंस्कृतीचं आणि ग्रामजीवनाचं यथार्थ दर्शन घडत असे. आपलं ग्रामजीवन किती समृध्द आणि स्वावलंबी होतं, याचं प्रत्ययकारी दर्शन ह्या म्हसोबा बनविण्याच्या या प्रथेमधून व्हायचं. आता प्रत्येक घरापुढे म्हसोबा केल्या जात नाहीत. नव्या पिढीला त्यासाठीचं मार्गदर्शन करणाऱ्या सासूबाई, आजीबाईही आता लोप पावताहेत. तरीही काही अपवादात्मक ठिकाणी आपल्या आजी-आई, सासूकडून चालत आलेला वारसा जपण्याचा प्रयत्न काहीजणी करताना दिसतात. ज्या गावांचे शहरीकरण खूप कमी प्रमाणात झाले आहे अशा गावांमध्ये मात्र जुन्या पिढीतल्या वयस्क महीला मात्र आजही शेणाचा म्हसोबाची सुंदर रचना करून छोटसं आटपाटनगर वसवतात. आजीकडून नातीकडे आणि सासूकडून सुनेकडे चालत आलेला हा वारसा प्रयत्नपूर्वक पुढच्या पिढीकडे देण्यासाठी त्या इच्छुक आहेत. आता गुरं सांभाळणं हेच दिव्य होऊन बसलंय. यांत्रिकी मदतीने शेतीकामे करण्याकडे कल आहे. यात गैर काहीच नाही. गावाकडच्या घरातले दूधदुभतेही घटत चाललेय. सारं काही अजस्त्र वेगाने बदलत चाललेय जे कुणीही रोखू शकत नाही. त्यामुळे काळाच्या ओघात अशा प्रथा नष्ट होत आहे.

# नारीशक्तीनी हातात घेतला गॅस सिलेंडर

## ग्रामस्थांचा निलेश विश्वकर्मांना आत्मीय प्रतिसाद

महासागर प्रतिनिधी

चंदुर रेल्वे,(दि.3)- वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. निलेश विश्वकर्मा यांची प्रचार एक्सप्रेस ग्रामीण भागात सुसाट वेगाने धावत आहे. प्रत्येक गावात त्यांचे आत्मीय स्वागत होत आहे. नारीशक्तीने तर हातात गॅस सिलेंडर घेऊन त्यांचे निवडणूक चिन्हाचा अभूतपूर्व पद्धतीने प्रचार सुरू केलेला आहे.

डॉ.निलेश विश्वकर्मा यांच्या प्रचाराचा झंझावात शिवणी, धानोरा माळी, राजुरा, बोरी या गावात दिसून पडला. शेकडो समर्थक आणि कार्यकर्त्यांसोबत डॉ.निलेश विश्वकर्मा आपली भूमिका स्पष्ट करत आहे. वंचित बहुजन आघाडी कडून आपली उमेदवारी का हे प्रत्येक मतदारांना पटवून सांगत आहे. प्रस्थापितांच्या विरोधात आपली लढाई का, विकास ग्रामीण भागात का पोहोचला नाही, आजही धामणगाव रेल्वे मतदार संघ



मागासलेला का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे ते मतदारांना देत आहे. मतदारही त्यांच्या ओजस्वी आणि प्रभावी भाषणाने भारावून जात आहे . ग्रामीण भागात सुरू असलेल्या प्रचारा दरम्यान धानोरा माळी येथील किरण साळुंखे, नंदू चोपडे, विठोबा भगत, अंकुश ढोबळे, भास्कर गडलिंग, मानसिंग पवार, विशाल पवार, सुरेश साळवे आदी प्रमुख कार्यकर्ता सहभागी होत आहे. डॉ.निलेश विश्वकर्मा यांची दिनचर्या सकाळ पासूनच मतदारांच्या आणि युवकांच्या गाठीभेटीने होत आहे, त्यानंतर ते नारीशक्तीचा आशीर्वाद घेत आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# गोवंश चोरीच्या घटनेत वाढ

## ■ नागरिकांनी चोपला चोरटा ■



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.3 )** - मोर्शी परिसरासह तालुक्यात मागील काही दिवसांपासून गोवंश चोरीच्या घटना वाढल्या आहे. परंतू यावर निर्बंध लावण्यात पोलीस प्रशासन अयशस्वी ठरत आहे. ज्यामूळे पशुपालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. त्यातच एका चोरट्याला शहरातील नागरिकांनी पकडून चोप दिल्याने येथे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

येथील तिरुपती नगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून गोवंश चोरीला जाण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने पशुपालक त्रस्त झाले होते. काल दि.2 नोव्हेंबर रोजी बलिप्रतिपदेच्या दिवशी रात्रीच्या अंधारात काही तरुण गोवंशांना पकडण्याचा प्रयत्न करीत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. त्यांनी त्याला पकडले व विचारपूस केली असता ते एका गोवंशाला पकडून नेत असल्याचे समजले. या घटनेवरून त्या चोराला नागरिकांनी चांगलाच चोप दिला व मोर्शी पोलिसांच्या ताब्यात दिले. त्या चोरट्यांच्या नातेवाईकांनी पोलीस स्टेशनमध्ये मोठा जमाव केला. त्यांनी तिरुपती नगरातील काही युवकांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. येथील माजी नगरसेवक व गोरक्षक रवींद्र गुल्हाने यांनी रात्री उशिरापर्यंत मध्यस्थी करून सामोपचाराने वाद मिटविला. सध्या परिस्थिती नियंत्रणात असून गोवंशांचे अवैध वाहतूक व चोरट्यांवर तात्काळ नियंत्रणाची मागणी नागरिकांकडून होत आहे. काही दिवसांपूर्वी एका शेतकऱ्यांच्या शेतातून एक गिर गाय चोरून नेऊन तिची कत्तल करण्यात आली असल्याचे समजते. महाराष्ट्र सरकारने गाईला राज्यमातेचा दर्जा देऊन गोमातेच्या हत्याबंदीचा कायदा अमलात आणला असतांना सुद्धा मोर्शी परिसरात गोवंशाची अवैध कत्तल व शहरातून होत असलेली अवैध वाहतूक रोखण्यात पोलीस प्रशासन मात्र सातत्याने अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे.दिवसेंदिवस वाढ होणाऱ्या या घटनांमुळे गोवंश प्रेमीमध्ये संतापाची लाट उसळलेली आहे.

### वाहनांमधून दररोज तस्करी

मोर्शी शहरातून सकाळच्या वेळेस सुसाट वेगात आयशर पिकअप या गाड्या जात असून या गाड्यांमधून अवैध गोवंश वाहतूक केल्या जात असल्याचे अनेकवेळा समोर आले आहे. सध्या निवडणूकीचे वातावरण असल्याने प्रत्येक ठिकाणी चेक पोस्ट लावण्यात आली असून पोलिसांची गस्त सुद्धा वाढविण्यात आली आहे. तरी सुद्धा या गोवंशाना गाडीत अमानुषपणे कोंबून जनावरांची अवैध तस्करी केल्या जाते. तरी गोवंश हत्या बंदीवर व जनावरे चोरून नेणाऱ्या आरोपींना विरुद्ध कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी या ठिकाणी जोर धरत आहे.

# शहराला गतवैभव प्राप्त करवून द्यायचे आहे! - डॉ.सुनील देशमुख

## पदम सौरभ कॉलनी येथे जाहिर सभा





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.3 )**- जेव्हा जेव्हा नागरिकांनी आपल्याला संधी दिली त्या त्यावेळी आपण त्यांनी दिलेला संधीचं विकासाच्या माध्यमातून सोनं करण्याचे पूर्ण प्रयत्न केला असून याही पुढे अमरावती शहराचे झालेली दुरावस्था सुधारून अमरावती शहराला गतवैभव मिळवण्याकरिता नागरिकांनी माझ्या उमेदवारीला समर्थन करावे असे आवाहन डॉ. सुनील देशमुख यांनी केले

ते शेगाव परिसरातील पदम सौरभ कॉलनी येथे जाहीर सभेमध्ये बोलत होते. यावेळी मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून डॉ.सुनील देशमुख यांना पाठिंबा दर्शविला.

यावेळी मंचावर काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे माजी स्थायी समिती सभापती बाळासाहेब भुयार, चांदूरबाजार कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रवीण वाघमारे, ज्येष्ठ नागरिक अशोकराव काकडे, माजी नगरसेवक विजय वानखडे, गोपाल धर्माळे, पंजाबराव देशमुख अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष राजेंद्र महल्ले, रवींद्र इंगोले प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ.देशमुखांनी सांगितले की, गेल्या पाच वर्षांमध्ये अमरावती शहराची मोठी दुरावस्था झालेली आहे. अमरावतीकर नागरिकांवर मोठ्या प्रमाणात वाढीव मालमत्ता कराचा बोजा लादण्यात आला होता आला होता. आणि निवडणुकांच्या तोंडावर आता त्याला स्थगिती देण्यात आली आहे, परंतु मुळात हा अन्याय कर जनतेवर लादला का होता आणि तो आता रद्द का करत नाही हा खरा सवाल असल्याचे डॉ.सुनील देशमुख यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे अमरावती शहरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. संपूर्ण शहरात साफसफाईचा पुरता बोजवारा उडालेला आहे. संपूर्ण महापालिका डबघाईस चाललेली असून संपूर्ण अनागोंदी माजलेली आहे. गेल्या महिन्याभरात शहरात तब्बल सात ते आठ खून झालेले असून अजून वर्षी संपायचे आहे तरी गुन्हेगारी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून या विषयावर लोकप्रतिनिधी अवाक्षरही काढायला तयार नाहीत. अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्थेत परिस्थिती अत्यंत बिकट झालेली असून सत्ताधारी पक्षाच्या लोकांचे हे अपयश आहे. अमरावती शहराचा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने विकास पूर्वीच्या काळात आपण केल्याचे नमूद करत अमरावती शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण आयआरडीपी योजने अंतर्गत करण्यात आले होते तिथे पुढे एक टप्पा जाऊन शहरातील सर्व मुख्य रस्त्यांचे बाजारपेठेतील मुख्य रस्त्यांचे कायमस्वरूपी काँक्रीटीकरण केल्यामुळे भविष्यात नागरिकांना खड्डेमुक्त रस्ते कायमस्वरूपी आपण उपलब्ध करून दिल्याचे सुद्धा त्यांनी नमूद केले.

# सामान्य प्रसूती नैसर्गिक जीवनक्रिया आहे- डॉ. रामपुरे



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.3 )**- नॉर्मल प्रसूतीमध्ये बाळाला वारंवार हॉस्पिटलमध्ये भरती करण्याची गरज पडत नाही.पोटाला टाके पडत नाही. प्रसवेला रुग्णालयात कमी भरती राहावे लागते. नॉर्मल प्रसुती पूर्णपणे नैसर्गिक जीवनक्रिया असल्याचे डॉ.परीक्षित रामपुरे यांनी सांगितले. डॉ.रामपुरे बोलताना पुढे म्हणाले की, सामान्य प्रसूती झालेली आई लवकरात लवकर दैनंदिन कामे करू शकते. पुढील प्रसूतीमध्ये गुंतागुंत होण्याची शक्यता कमी असते. आईला दुध लवकर येते. मात्र दुसरीकडे सिझेरियन प्रसूतीचा जोर वाढतो आहे. ही प्रसूती अप्रकृतीक आहे. यात बाळाला श्वासोच्छास घेण्यास त्रास होतो. रक्तस्त्राव होण्याची शक्यता जास्त असते. बोलतांना पुढे म्हणाले की सिझेरियन प्रसुती करावीच लागते याचे मोजकी कारणे असु शकते. बाळ आडवे, वर गर्भाशयाच्या तोंडावर असणे, प्रसूतिमार्ग अपुरा पडणे ही मोजकी कारणे आहेत. शक्यतो नैसर्गिक प्रसूती आईसाठी व बाळासाठी आवश्यक असल्याचे डॉ.रामपुरे यांनी सांगितले.

# ट्रकवर धडकली दुचाकी, एक ठार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती**- भरधाव दुचाकी उभ्या ट्रकवर धडकल्याने एकाचा मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला. ही घटना एमआयडीसी परिसरातील जुन्या बायपास मार्गावरील रविवारी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास घडली. नरेश प्रभाकर समुद्रे (45 रा. महावीर नगर) यांचा मृतामध्ये समावेश आहे.

नरेश हा मजुरीचे काम करीत होता. रविवारी दुपारच्या सुमारास नरेश हा त्याच्या एका सहकार्यासोबत दुचाकीवरून बडनेरा मार्गे दस्तूर नगराकडे जात होता. दरम्यान जुन्या बायपास मार्गावरील एमआयडीसी स्थित घरकुल मसाला कारखाना समोरील रस्त्यावर त्यांची एम एच 04 जे यु 0609 या क्रमांकाची दुचाकी उभ्या ट्रकवर धडकली.

# फत्तेपूर बाबांच्या यात्रेत उसळली भाविकांची गर्दी

## .अफाट श्रद्धेपोटी गर्दी



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.3 )** - तालुक्यातील येरड (खरबी) येथील फत्तेपूर बाबांच्या यात्रेत दर्शनाकरीता शनिवारी (ता. 2) अलोट गर्दी दिसून आली असुन फत्तेपूर बाबांवर भाविकांनी अफाट श्रद्धा यावेळी दाखविली.

चांदूर रेल्वे तालुक्यातील येरड (खरबी) या ठिकाणी फत्तेपूर बाबांचे एक छोटेसे मंदीर आहे. पुरातन काळापूर्वी याच गावात फत्तेपुर बाबांच्या दगडाच्या मूर्तीची स्थापना झाली. हि स्थापना श्रीमंत रघुजी राजे भोसले यांच्या पुरातन काळातील आहे. हि फत्तेपूर बाबांची मुर्ती कडुनिंबाच्या गोल आकाराच्या झाडाखाली असून हे निंबाचे झाड बाराही महिने हिरवेगारच असते हे एक विशेष आहे. दरवर्षी दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी यात्रा भरत असते. जनावरांचा देव म्हणून श्रद्धा असलेल्या फत्तेपुर बाबांच्या दर्शनासाठी या परिसरातील शेतकरी शेतमजूर आपल्या गाई, म्हशी,बैल, बकरी इत्यादी हजारो जनावरे व काही हवसे गवसे नवसे आपल्या गाईंना सजवून गौळणींना वाजत गाजत घेऊन व नाचत फत्तेपूर बाबांच्या दर्शनासाठी घेऊन आले होते. यात्रेच्या दिवशी फत्तेपूर बाबांच्या मंदिरात हजारो नारळ फुटल्या गेले. येरड (खरबी) येथील गावकऱ्यांतर्फे ठेवलेल्या महाप्रसादाचा लाभ यात्रेमध्ये आलेल्या हजारो भाविक भक्तांनी घेतला असून फत्तेपूर बाबांवर भाविक भक्तांनी अफाट श्रद्धा दाखविली आहे. या यात्रेमध्ये तळेगाव दशासर पोलीस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तळेगाव पोलिसांचा चोख बंदोबस्त पहावयास मिळाला.

# स्नेह वृध्दींगत करणारा दिपोत्सव उपक्रम-न्यायाधिश यार्लगड्डा






**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.3 )**- अमरावती जिल्हा वकील संघा ला दिपोत्सव ही एक उत्तम सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. या माध्यमातून वकील संघ स्नेह वृध्दींगत करण्याचे एक चांगले कार्य सातत्याने दरवर्षी करीत असते. अमरावती वकील संघाची ही परंपरा सांस्कृतिक सौदार्याला चालना देणारी आहे, असे गौरवोद्गार जिल्हा प्रमूख न्यायाधिस एस.व्ही.यार्लगड्डा यांनी वकील संघाच्या दिपोत्सव कार्यक्रमात व्यक्त केले.

अमरावती वकील संघाला ही एक सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे याच अंतर्गत अमरावती जिल्हा बार असोशियन दरवर्षी दिपोत्सव हा उपक्रम मोठया थाटात साजरा करीत असते. या वर्षी शुक्रवारी जिल्हा न्यायालय प्रांगण परिसरात दिपोत्सव कार्यक्रम संपन्न झाला .कार्यक्रमाचे उद्घाटक जिल्हा प्रमूख न्यायाधिस एस.व्ही.यार्लगड्डा हे होते, तर अध्यक्ष स्थानी वकील संघाचे अध्यक्ष अँड.विश्वास काळे हे होते. यार्लगड्डा यांनी वकील संघाच्या या उपक्रमाचे खूप कौतूक केले ते म्हणाले या पध्दतीचा असा हा चांगला उपक्रम या आधी मला कुठे होतांना दिसला नाही. सामाजिक सौदार्य टिकवून ठेवण्या साठी वकीलांची एक सामाजिक जवाबदारी असते अमरावती वकील संघ ही समाज जवाबदारी उत्तम पणे पार पाडत आहे. कार्यक्रम प्रारंभी दिप प्रज्वलाना नंतर वकील संघाचे सचिव अँड. चंद्रसेन गुळसुंदरे यांनी केलेल्या प्रास्ताविकात वकील संघाच्या विविध कार्याची उपस्थितांना माहिती दिली. या वर्षी निवडणूक आचारसंहिते पूर्वी न्यायालय परिसरातील अंतर्गत रस्ते बांधकाम , पक्षकार साठी शिदोरी मंडप आणि मंचक निर्माण साठी निधी मंजूर करून घेतला आहे अशी माहिती वकील संघाचे अध्यक्ष अँड. विश्वास काळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिली. महिला वकीलांनी न्यायालय मुख्य इमारतीच्या प्रवेशव्दारा वर सुंदर रांगोळी व दिव्यांची आरास करून या कार्यक्रमाचे सौंदर्य खुलवले सर्व न्यायाधिशांनी रांगोळी व दिवे आरास पाहून महिला वकीलांच्या या कलेचे कौतूक केले.

# मविआ, महायुती मधील पक्षांना खिंडार!



## अनेक कार्यकर्त्यांचा प्रहारमध्ये प्रवेश

## बच्चू कडू यांना वाढते जनसमर्थन

### प्रहार मोठी शक्ती म्हणून उदयास येणार- कडू

वाढत्या जन समर्थनामुळे बच्चु कडू यांची बाजू बळकट झाली असून विरोधी उमेदवारांनी याचा धसका घेतल्याचे दिसून येते. पक्ष प्रवेशाचे सत्र असे सुरू राहणार व प्रहार एक मोठी ताकद म्हणून उदयास येणार सोबतच महाराष्ट्राच्या राजकारणात प्रहार एक मोठी भूमिका बजाविणार असा दावा प्रहारचे संस्थापक बच्चू कडू यांनी केला आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.3 )**- अचलपूर मतदारसंघात निवडणूकीसाठी बांधणी केलेल्या महाविकास व महायुतीमधील पक्षांना आपोआप खिंडार पडताना दिसत आहे. विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा प्रहार पक्षाकडे जाण्याचा ओघ वाढला आहे. काँग्रेस-भाजप-सेना व अन्य पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी प्रहार जनशक्ती पक्षात जाहीर प्रवेश करीत बच्चू कडू यांच्या मागे खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार करीत आहे .

राजकीय दृष्ट्या अतिसंवेदनशील असलेल्या अचलपूर मतदार संघात तिसरी आघाडी असलेली परिवर्तन महाशक्ती व प्रहार जनशक्ती पक्षाचे उमेदवार बच्चू कडू हे पाचव्यांदा विजयश्री मिळविण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे. त्यांना विविध पक्ष, संघटना व संस्थांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. यामुळे त्यांची बाजू भक्कम होताना दिसत आहे. मतदारसंघातील अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील काँग्रेस - भाजप सेना व अन्य पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बच्चू कडू यांच्या उपस्थितीत प्रहारमध्ये प्रवेश करीत बच्चू कडू यांचे हात बळकट करून त्यांच्या पाचव्या विजयाचा संकल्प केला आहे.

राजना पूर्णा येथील काँग्रेस पक्षातील युवकांचा समीप तायडे यांच्या नेतृत्वात शेकडो काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रवेश घेऊन बच्चू कडू यांच्या विजयाची कमान हाती घेतली आहे. यांसह कुरळ पूर्णा, बोरगाव मोहना, बोपापुर येथील काँग्रेस कार्यकर्त्यांचा तसेच करजगाव येथील भाजप चे कट्टर कार्यकर्ते श्यामराव भिडे, योगेश भिडे, परतवाडा येथील गणेश नगर मधील सिंधी बांधवांनी सुद्धा बच्चू कडू यांचे हात बळकट करण्यासाठी शपथ घेतली. काँग्रेस, भाजप कार्यकर्त्यांनी अचानकपणे घेतलेल्या या प्रवेशामुळे काँग्रेस व भाजपच्या गोटात खळबळ निर्माण झाली असून या प्रवेशामुळे मात्र बच्चू कडू यांच्या विजयाचा मार्ग सुकर होत असल्याचे दिसत आहे.

# अनोखी बलिप्रतिपदा : पाळीव पशूंनी दिला मतदानाचा संदेश

## जनजागृतीचा पहिला प्रयोग




**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.3 )** - सध्या राज्यात दीपोत्सवाचा माहौल आहे. यासह विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुद्धा जोर धरत आहे. एवढे असूनही राज्यातील काही ठिकाणी मतदानाची टक्केवारी कमी राहते. ही टक्केवारी वाढावी म्हणून निवडणूक आयोगामार्फत स्वीप हा मतदान जनजागृती संदर्भात उपक्रम राबविण्यात येतो. धामणगाव विधानसभा क्षेत्रात मतदानाची टक्केवारी वाढावी दीपोत्सवातील विविध सणांचा आधार घेण्यात आला. आज बलीप्रतिपदाच्या मुहूर्तावर धामणगाव रेल्वे मतदार क्षेत्रातील चांदूर रेल्वे तालुक्यातील अनेक गावांमध्ये गाई,गोंदण उत्सव निमित्ताने पाळीव प्राण्यांची रंगरंगोटी करून त्याद्वारा मतदान जनजागृती करण्याचा अफलातून प्रयोग करण्यात आला. देशात कदाचित अश्या प्रकारचा निवडणूक जनजागृतीचा पहिला प्रयोग असावा.

विधानसभा निवडणूक निमित्ताने जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांचे मार्गदर्शनाखाली प्रत्येक विधानसभा क्षेत्रात स्वीप कक्षाची निर्मिती करण्यात आली. सध्या दीपावली उत्सव असल्याने शाळांमध्ये दीपावली उपक्रमाचे आयोजन केले होते.यात रांगोळी रेखाटन, पणती सजावट, फलक सजावट, आकाश कंदील निर्मिती, आदी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. गाई गोंदण उत्सवाच्या निमित्याने मांजरखेड, लालखेड, पळसखेड, मालखेड, दहीगाव, चांदूर रेल्वे सारख्या गावांमध्ये पशू पालकांनी मी मतदान करणार, आपले हक्क आपले मत, मतदान करा देश घडवा, मतदान करा देश बळकट करा, लोकशाही करा पक्की..मतदान करा नक्की.. आदी मतदान जनजागृतीचा संदेश आपल्या पाळीव प्राण्यांच्या माध्यमातून सर्व सामान्य मतदारापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण मतदारांच्या तुलनेत शहरी मतदारांची टक्केवारी कमी असल्याने किमान पशूपालनाच्या माध्यमांतून एक आगळावेगळा संदेश या समाजाला जात आहे. या जनजागृतीद्वारा किमान मतदानाची टक्केवारी वाढेल असा आशावाद स्वीपचे नोडल अधिकारी संदीप बोडखे यांनी व्यक्त केली आहे.

### आता तरी मतदान करणार का ?

दिवाळी उत्सव असल्याने अनेक जणांनी बाहेरगावी पर्यटनाचे बेत आखले आहे. उत्सव लगत 20 नोव्हेंबरला मतदान करीता सुट्टी असल्याने पर्यटन न करता मतदान करावे. आम्ही ग्रामीण भागातील पशुपालक असून सुध्दा आमच्या गुरं - ढोरांमुळे माध्यमांतून मतदान करण्यासाठी गाई गोंदणच्या पर्वावर एक मतदान जनजागृतीचा प्रयत्न केला असल्याचे चांदूर रेल्वे तालुक्यातील लालखेड येथील पशूपालक तुळशीराम चव्हाण यांनी सांगितले.